बुधवार, दि ६ ऑगस्ट २०२५ ● जालना ● वर्ष १२ वे ● अंक ४७ वा ● किमंत २ रु. ● पाने ४
RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886
https://yuvaadarsh.com
युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

# स्वस्त धान्य दुकानदारांनी अनियमितता केल्यास कारवाई

## कुंभेफळ येथील स्वस्त धान्य दुकानाचे प्राधिकारपत्र रद्द

**जालना । प्रतिनिधी -** रास्त भाव दुकानामध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता होणार नाही याबाबत जालना जिल्ह्यातील सर्व रास्तभाव दुकानदारांनी दक्षता घ्यावी, तसेच नियमित धान्य वाटप करण्याबाबत उचित कार्यवाही करावी. स्वस्त धान्य दुकानदारांनी अनियमितता केल्यास महाराष्ट्र अनुसूचित वस्तु (वितरणाचे विनियमन) आदेश, १९७५ अन्वये कारवाई करण्यात येईल, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

रास्त भाव दुकानामध्ये नियमित अन्नधान्य वाटप न करणे, धान्याची पावती न देणे, दुकान वेळेत सुरु न ठेवणे, नोंदवह्या नसणे, दर्शनिय भावफलक नसणे आदि गंभीर त्रुटी तपासणीदरम्यान आढळुन आल्या आहेत. महाराष्ट्र अनुसूचित वस्तु (वितरणाचे विनियमन) आदेश, १९७५ मधील नियम ३ (क) अंतर्गत जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर यांनी जालना तालुक्यातील कुंभेफळ येथील रास्त भाव दुकानदार गणेश श्रीमंत गवारे यांचे दुकान क्र.१०५ चे प्राधिकारपत्राची १०० टक्के अनामत रक्कम जप्त करुन प्राधिकारपत्र रद्द करण्यात आले. यावेळी सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी प्रकाश जाधव, निरीक्षण अधिकारी व इतर कर्मचाऱ्यांनी रास्तभाव दुकानाची तपासणी केली व प्रत्यक्ष स्थळपाहणी करुन ग्राम स्थांच्या समस्या जाणून घेतल्या.

## चौथ्यांदा बैठक रद्द

**जालना -** समृद्धी बाधीत शेतकऱ्यांच्या आंदोलनाला १०४ दिवस झाले. मंगळवार (दि १२) मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. मात्र, काही अपिहार्य कारणामुळे ही बैठक रद्द झाली. आंदोलनकर्त्यांनी यावर नाराजी व्यक्त केली. आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या मध्यस्थीने ही बैठक होणार होती. आता आंदोलनकर्त्यांनी १५ ऑगस्टची डेडलाईन दिली आहे.

## टेंभुर्णी जिल्हा परिषद गटात निवडणुकीची रंगत

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचा मार्ग न्यायालयाच्या निर्णयानंतर मोकळा झाल्याने जाफराबाद तालुक्यातील राजकीय वातावरण तापू लागले आहे. नव्याने झालेल्या प्रभाग रचनेमुळे तालुक्यातील सर्वच गट व गणांमध्ये इच्छुकांची चळवळ सुरू झाली आहे. विशेषतः टेंभुर्णी जिल्हा परिषद गटात भाजप, शिवसेना (उद्धव ठाकरे गट), शिवसेना (शिंदे गट), राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) व काँग्रेस पक्षांकडून मोर्चाबांधणीला वेग आला आहे. गावागावांत लोकांच्या गाठीभेटी घेणे, कार्यकर्त्यांची भेट, साखरपेरणी याला सुरुवात झाली आहे. उमेदवारीसाठी इच्छुकांची गर्दी वाढली असून पक्षश्रेष्ठींना पटवण्यासाठी नेत्यांकडे सतत मनधरणी सुरू आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका ग्रामीण भागात नेतृत्व सिद्ध करण्याचे महत्त्वाचे व्यासपीठ असल्याने अनेक तरुण या निवडणुकीत आपले नशीब आजमावत आहेत.




उबाठा शिवसेना पक्षाकडून जनार्दन झोरे व गजानन मुळे यांची नावे पुढे आहेत. भाजपकडून शालिकराम पाटील म्हस्के, तर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)

पान २ वर




युवा आदर्श

**बार काम ...**

पुरता पुरेना वेळ हा
तुडुंब तुंबलेले काम
बारमध्ये नेतोफाईल
मुळीचं नाही विश्राम
केले नाही रे गैरकर्म
उगा लावता इल्जाम
दमलोथकलो म्हणून
हातात धरलायं जाम
नको खुळचट सवाल
कुणी केला इंतजाम
ग्लास बाटली चकणा
यात कसला सरंजाम
कोण काढे व्हिडीओ
जगणे करतोय हराम
उगा अडकवे निष्पाप
आता राहिला न राम
स्ट्रॉंग असताना ए सी
दरदरून फुटला घाम
रात्रंदिवस करी काम
जाणला नसे अंजाम
कोण घेणारं जोखीम
असे असेलं परिणाम
हलणारं नाही फाईल
तुम्हांस शतशः प्रणाम

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.



# संपादकीय

## ध्वजसंहितेचे पालन करून घरोघरी तिरंगा फडकवावा!

यावर्षी आपण ७९ वा भारतीय स्वातंत्र्य दिन साजरा करीत आहोत. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला इंग्रजांच्या गुलामीतून स्वातंत्र्य मिळाले त्या घटनेला आज ७८ वर्ष पूर्ण झाली आहेत. अर्थात हे स्वातंत्र्य आपल्याला सहजासहजी मिळाले नाही हे स्वातंत्र्य मिळवण्यासाठी अनेकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली कित्येकांना तुरुंगवास भोगावा लागला. हजारो, लाखो




क्रांतिकरांकांच्या, स्वातंत्र्य सैनिकांच्या त्यागातून आपल्याला हे स्वातंत्र्य मिळाले आहे. या हजारो, लाखो ज्ञात- अज्ञात क्रांतिकारकांच्या, स्वातंत्र्य सैनिकांच्या कार्याची ओळख आजच्या पिढीला व्हावी व त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन आजच्या तरुण पिढीनेही देशकार्यासाठी पुढे यावे या उद्देशाने देशभर स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव उत्साहात साजरा करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव कार्यक्रमांतर्गत अनेक उपक्रमांचे आयोजन सरकारने केले आहे त्याचाच एक भाग म्हणून आजपासून म्हणजे १३ ऑगस्ट पासून १५ ऑगस्ट पर्यंत घरोघरी तिरंगा हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमाअंतर्गत भारताच्या ध्वज संहितेच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करून भारताच्या नागरिकांना आपल्या घरी ध्वज फडकविण्याची परवानगी देण्यात आली. या दिवशी देशातील नागरिकांनी आपल्या घरावर तिरंगा ध्वज अभिमानाने फडकवावा असे आव्हान सरकारतर्फे करण्यात आले आहे. घरोघरी तिरंगा या उपक्रमाची जनजागृती व्हावी यासाठी देशभर विविध कार्यक्रम चालू आहेत. तिरंगा हा आपला राष्ट्रध्वज आहे. देशाचे मानचिन्ह म्हणजे तिरंगा. स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन या सारख्या राष्ट्रीय सणांच्या दिवशी तिरंगा अभिमानाने फडकावून तिरंग्याला मानवंदना देणे हे आपले कर्तव्यच आहे. १३, १४ आणि १५ या तीन दिवशी सर्व नागरिकांनी आपल्या घरावर तिरंगा अभिमानाने फडकवावा आणि तिरंग्याला मानवंदना द्यावी. घरोघरी तिरंगा फडकवताना ध्वज संहितेचे काटेकोरपणे पालन करावे. ध्वज फडकवताना ध्वजाचा कुठल्याही प्रकारे अवमान होणार नाही याची काळजी नागरिकांनी घ्यावी. पूर्वी ध्वज तयार करण्यासाठी हाताने विणलेले किंवा कातलेले कापड वापरले जाई आता यंत्रावर तयार केलेले कापड देखील तयार करण्यास परवानगी देण्यात आली आहे मात्र हा कापडी तिरंगा ध्वज, चुरगळलेला, फाटलेला, किंवा खराब झालेला नसावा. ध्वज फडकवताना केशरी रंग वरच असावा कोणत्याही परिस्थितीत तो तळाशी राहणार नाही याची काळजी घ्यावी. तिरंगा ध्वज फडकवताना तिरंग्यापेक्षा जास्त उंचीवर किंवा शेजारी दुसरा कोणताही ध्वज फडकवू नये. एकाच ध्वजारोहणाच्या खांबावरती तिरंग्या सोबत दुसरा कोणताही ध्वज फडकवू नये. तिरंगा उंचावरच फडकावा. तिरंगा फडकवल्यानंतर तो खाली पडणार नाही याची काळजी घ्यावी. ध्वज उतरवताना देखील ध्वज संहितेचा मान राखावा. सन्मानपूर्वक ध्वज उतरावा. कुठल्याही परिस्थितीत तिरंग्याचा अवमान होणार नाही याची काळजी नागरिकांनी घ्यावी कारण तिरंगा हे आपले राष्ट्रीय प्रतीक आहे तिरंग्याला अपमान म्हणजे देशाचा अपमान. १५ ऑगस्ट नंतर तिरंगा ध्वज व्यवस्थित घडी घालून सन्मानपूर्वक ठेवावा. ध्वज संहितेच्या नियमांचे पालन करून प्रत्येकाने आपल्या घरावर डौलाने तिरंगा फडकवावा व घरोघरी तिरंगा हा उपक्रम यशस्वी करावा. जयहिंद ! जयभारत!!

# भगवान शिवाला स्मरून चैतन्य शक्तीच्या बळावर कार्य करणाऱ्या अहिल्याबाई होळकर !

'एक स्त्री असून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत समर्थपणे राज्यकारभार करून अहिल्याबाई होळकर यांनी २८ वर्षे इंदूर राज्यकारभाराची धुरा कशी सांभाळली ?', याविषयी माहिती सांगणार हा लेख !

अहिल्याबाई होळकर यांनी केलेली शिवोपासना आणि त्यांचे कार्य

शिवाच्या उपासनेतून स्वतःमध्ये चैतन्य निर्माण करून राज्यकारभाराची धुरा समर्थपणे सांभाळणे - अहिल्याबाई होळकर भगवान शिवाच्या भक्त होत्या. त्या प्रतिदिन शिवाची पूजा करत. शिवाच्या उपासनेतून त्यांनी स्वतःमध्ये चैतन्य निर्माण केले होते. त्या चैतन्यशक्तीच्या द्वारेच त्यांनी राज्यकारभाराची धुरा समर्थपणे सांभाळली.

सतत शिवाची पिंडी समवेत ठेवणे आणि शिवाला स्मरून कार्य करणे - कोणतेही कार्य यशस्वीरित्या पूर्ण होण्यासाठी चैतन्यशक्तीची आवश्यकता असते. याची जाणीव अहिल्याबाई यांना होती. त्यांचा भगवंताविषयी भाव होता. 'भगवंताची चित्शक्तीच सतत कार्य करत असते', हा भाव ठेवूनच त्या सतत शिवाची पिंडी समवेत ठेवत असत. भगवान शिवाला स्मरून त्याच्यातील चैतन्य शक्तीद्वारे त्या कार्य करत. यामुळे त्या करत असलेल्या कार्याला यश मिळत गेले. कार्य करतांना त्यांच्यात कुठेच अहंभाव नव्हता. यावरून 'भगवंताच्या चैतन्यामध्ये किती शक्ती आहे', हे लक्षात येते.

स्वतः समवेत सर्वांनी शिवाची उपासना करावी, यासाठी शिवाचे मंदिर बांधणे - स्वतःसमवेतच सर्वांनी चैतन्यशक्तीद्वारे कार्य करावे, शिवाची उपासना करावी, यासाठी त्यांनी शिवाचे मंदिर बांधले. 'मंदिरातील चैतन्यशक्तीचा लाभ सर्व जनतेला होईल आणि आपोआपच सर्व जनता योग्य आचरण करील', अशी त्यांची श्रद्धा होती.



जुन्या देवळांचा जीर्णोद्धार करणे आणि धर्मशाळा बांधणे - अहिल्याबाई होळकर यांनी अनेक जुन्या देवळांचा जीर्णोद्धार केला. प्रजेच्या सुखसुविधांसाठी त्यांनी नदीकिनारी अनेक घाट बांधले, तसेच अनेक धर्मशाळाही बांधल्या. 'राज्यातील जनतेचा खर्या अर्थाने विकास कशामुळे होणार आहे ?', याची जाणीव त्यांना असल्यामुळे त्यांनी देवळांचा जीर्णोद्धार आणि धर्मशाळा यांना महत्त्व दिले; कारण त्यातील चैतन्यशक्तीमुळेच लोकांमध्ये जागृती होऊन ते सदाचाराने वागत असत. त्यामुळेच राज्यात शांतता आणि सुव्यवस्था होती अन् प्रजा सुखी होती.

राघोबा पेशवे इंदूरवर स्वारी करणार असल्याचे कळल्यावर अहिल्याबाईंनी त्यांना दिलेल्या सणसणीत उत्तरावरून 'त्यांच्यातील हा कणखरपणा आणि लढवय्या वृत्ती केवळ चैतन्यशक्तीमुळे निर्माण झाली', हे लक्षात येणे - राघोबा पेशवे यांनी इंदूरवर स्वारी करून होळकरांचे राज्य बळकावण्याचा मनसुबा आखल्यावर अहिल्याबाई होळकर यांनी राघोबादादांना पत्राद्वारे सणसणीत उत्तर दिले, 'माझ्याशी लढतांना तुम्ही जिंकलात, तर स्त्रीशी लढून कोणता पुरुषार्थ दाखवणार आहात ? जर तुम्ही या युद्धात हरलात, तर स्त्रीकडून पराजित झाल्यामुळे तुम्हाला जगाला तोंड दाखवता येणार नाही. त्यामुळे युद्ध करण्यापूर्वी विचार करा.' हे पत्र वाचून राघोबांनी युद्ध करण्याचे टाळले. 'एका महिलेमधील हा कणखरपणा आणि लढवय्या वृत्ती ही केवळ चैतन्यशक्तीमुळे निर्माण झाली', हे वेगळे सांगायला नको. त्यामुळेच अहल्याबाई सर्वांसाठीच आदर्श ठरल्या.

भारताची केविलवाणी सद्यःस्थिती सुधारण्यासाठी सर्व शासनकर्त्यांनी अहिल्याबाई होळकरांचा आदर्श समोर ठेवणे आवश्यक !

भारताची अत्यंत केविलवाणी सद्यःस्थिती पाहिल्यास सर्व शासनकर्त्यांनी अहिल्याबाई होळकरांचा आदर्श समोर ठेवणे आवश्यक आहे; कारण आतंकवादी आक्रमण, नक्षलवाद, भ्रष्टाचार, शेतकर्यां च्या समस्या, पर्यावरणातील प्रदूषण इत्यादी अनेक समस्यांमुळे मनुष्याला जिवंत रहाणेही कठीण झालेले आहे. या सर्व समस्यांसाठी कुणाकडे काहीच उपाययोजना नाही. यावर चैतन्यशक्तीला जागृत करणे, हा एकच उपाय आहे; कारण या स्थितीला सावरण्याचे सामर्थ्य केवळ चैतन्यशक्तीत आहे, जी शाश्वआत, चैतन्यमय आणि आनंदमय आहे. यासाठी प्रत्येकाने भगवंताला शरण जाऊन भगवंताची उपासना करणे आवश्यक आहे.

**संकलक : कु. प्रियांका लोणे,**
**मराठवाडा संघटक, हिंदु जनजागृती समिती,**
**संपर्क क्र.: ८२०८४४३४01**

# राजर्षी छत्रपती शाहू विद्यालयात रक्षाबंधन कार्यक्रम उत्साहात





**जालना -** तालुक्यातील राजर्षी छत्रपती शाहू महाराज विद्यालय डुकरी पिंपरी,ता.जि.जालना या शाळेत रक्षाबंधन कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक सी.जी.वाघमारे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून डी.एन.सोनकांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी शाळेतील वर्गातील सर्व विद्यार्थिनींनी विद्यार्थ्यांना राख्या बांधून हा सण साजरा केला. तसेच मुलांनी राखी बांधून मुलींना शैक्षणिक साहित्य भेट दिली. कार्यक्रम यशस्वी शाळेचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी डी. एन.सोनकांबळे, पी.पी.नागरे, श्रीमती.ए.बी.देशपांडे, एल.बी. जाधव, आर.एस.ठाकरे, एस.बी. राऊत, श्रीमती एम.ए.खरात आदींनी परिश्रम घेतले.

पान १ वरुन

## टेंभूर्णी जिल्हा ...

कडून रामधन पाटील कळंबे हे इच्छुकांच्या रांगेत आघाडीवर आहेत. तालुक्यातील राजकीय समीकरणे गुंतागुंतीची आहेत. जाफराबाद तालुक्यात भाजपचे वर्चस्व असले तरी प्रवास नगरपंचायतीत राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेसचा प्रभाव दिसतो. वरुड गटात शिवसेना (उद्धव गट) मजबूत आहे. गेल्या तीन-चार वर्षांत सर्वच पक्षांत मोठ्या उलथापालथी झाल्या आहेत. आघाड्यांमध्ये बदल, कार्यकर्त्यांची देवाणघेवाण, तसेच अंतर्गत गटबाजीमुळे निवडणुकीत अटीतटीची लढत होण्याची शक्यता आहे.

जनार्दन झोरे हे उच्चशिक्षित असून त्यांचा मोठा समर्थक वर्ग आहे. सामाजिक कार्यामुळे त्यांना जनतेत लोकप्रियता मिळाली आहे. स्थानिक शिवसैनिकांचा विश्वास आहे की, त्यांना उमेदवारी दिल्यास शिवसेनेची ताकद गटात वाढेल. माजी सरपंच विष्णू जमधडे व शिवसैनिक गजानन मुळे यांच्यासह अनेकांनी त्यांना निवडणुकीत उतरण्यासाठी मनधरणी सुरू केली आहे.

टेंभुर्णी जिल्हा परिषद गटातील निवडणूक ही केवळ गटातील नव्हे तर तालुक्यातील सर्वच प्रमुख पक्षांच्या प्रतिष्ठेची लढत ठरणार आहे. पारंपरिक उमेदवारांना संधी मिळेल की नव्या चेहऱ्यांना, हे आगामी पक्षनिर्णयावर अवलंबून असेल. मात्र सध्या गावोगावी निवडणुकीचा माहोल चांगलाच रंगू लागला आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# आई-बापाचे कष्ट ओळखा; तेच खरे देव

## वसंत हंकारे यांच्या व्याख्यानाने मुली भावूक; डोळ्यात आश्रू, मनात जाणीव...

**जालना । प्रतिनिधी -** आई-वडील आपल्या मुलांना आणि मुलींना सांभाळतांना रक्ताचं पाणी करता, हाडाची काडं करुन लेकरांना यशस्वी करण्याची स्वप्न पाहतात. परंतु, काही मुलं-मुली या आई-बापाच्या कष्टाचा विचार न करता त्यांच्या स्वप्नांना चुराडा करुन स्वतःच्या आयुष्याची बरबादी करुन घेतात. अशा वेळी देव सुध्दा तुमची साथ सोडतो, कारण, मुला-मुलींचे देव म्हणजेच आई-बाप असतात, अशा देवाला दुःखी करुन तुम्ही कुठे सुखी होणार आहात? त्यामुळे आई-बापाला कधीच दुखवू नका असा संदेश प्रसिध्द व्याख्याते वसंत हंकारे यांनी मुला-मुलींना दिलाय. मंगळवार दि. १२ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ८ वाजता जैन मराठी शाळेत खा. डॉ. कल्याणराव काळे यांच्या संकल्पनेतून स्व. वैजिनाथराव काळे स्मृती प्रतिष्ठान च्या वतीने श्री वसंत हंकारे सरांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. वसंत हंकारे बोलत असतांना उपस्थित मुलींच्या भावना अनावर झाल्या, आणि मुली ढसा-ढसा रडू लागल्या.

या कार्यक्रमाला माजी आमदार अरविंदराव चव्हाण, स्व. वैजिनाथराव काळे स्मृती प्रतिष्ठाण चे सचिव श्री भाऊसाहेब बापू काळे, माजी सभापती भाऊसाहेब घुगे, जयप्रकाश चव्हाण, कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष कृष्णा पाटील पडुळ, नंदा पवार, गणेश चांदोडे, नारायण वाढेकर, माजी उप सभापती सोपान तिरुखे, संस्थेचे अध्यक्ष सुदेशकुमार सकलेचा, सहसचिव कचरुलाल कुंकुलोळ, शाळेचे अध्यक्ष भायाणी, मुख्यध्यापक वानगोता, माजी मुख्यध्यापक कुंकुलोळ, राजेश खडके, अक्षय पवार यांची उपस्थिती होती.

आपल्या आई-बापाला शेवटच्या श्वासापर्यंत जीव लावा, त्यांच्या प्रत्येक श्वासावर प्रेम करा, कारण आई-बापाचा श्वास निघून गेला, तर भिंतीवरच्या फोटोतील आई-बाप तुम्हाला कधीच जीव लावायला परत येणार नाही. याची जाणीव ठेवा असे आवाहन वसंत हंकारे यांनी केले.

खा. डॉ. कल्याण काळे यांच्या संकल्पनेतून वसंत हंकारे यांचे जैन मराठी शाळेत न समजलेले आई बाप.. समजून घेताना या विषयावर आयोजित करण्यात आले होते. यावेळी शेकाडो विद्यार्थी आणि विद्यार्थीनी सहभागी झाल्या होत्या.

वसंत हंकारे यांचे व्याख्यान सुरु असतांना प्रत्येकाच्या काळजाचा ठोका चुकत होता, हंकारे यांनी मुलींच्या डोळ्यासमोर आई-बापाचे कष्ट आणि लेकरावर जीव ओतनारा बाप उभा केला होता. त्यामुळे मुली देखील भाऊक झाल्या, त्यांच्या डोळ्यात अश्रु तरळून आले. मुला-मुलींच्या आयुष्यात प्रलोभने दाखविणारे भरपुर येतील, परंतु, त्या प्रलोभनांना बळी पडू नका, त्यांच्यामागे जावू नका, आई-बापाचे स्वप्न हे लेकरं मोठ्या पदावर गेल्यावरच पुर्ण होतात, त्यामुळे त्यांचा विश्वास कधीच तुटू देऊ नका असे आवाहन हंकारे यांनी केले.

आपल्या आई-बापाला समजून घेण्याची वेळ आली आहे. आपल्या एखाद्या कृत्याने आई-बापाची मान खाली जाईल असे कृत्य आपल्या हातून घडणार नाही, याची काळजी घेण्याचे सांगत त्यांना लाचार करू नका, त्यांचे नाव उज्वल करण्यासाठी चांगले संस्कार मनाशी बाळगा.



भविष्यात डॉक्टर, इंजिनिअर, वकील झालात आणि लाखो रुपये कमवून ठेवले, मात्र ते पाहण्यासाठी जर आई-बाप नसतील तर तुम्हाला त्या कमवलेल्या पैशांचा उपयोग काय? हा प्रश्न त्यांनी विद्यार्थ्यां समोर मांडला.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्रीमती सोमानी यांनी केले.

## सिद्धार्थ महाविद्यालयात हर घर तिरंगा रॅलीचे उत्साहात आयोजन




**विशाल देशमुख जाफ्राबाद -** सिद्धार्थ महाविद्यालय,जाफ्राबाद येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत १५ ऑगस्ट २०२५ - ७८ वा स्वातंत्र्य दिवस निमित्त हर घर तिरंगा अभियान राबविण्यात येत आहे. या अनुषंगाने दिनांक १२ ऑगस्ट, २०२५ वार मंगळवार रोजी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांद्वारे हर घर तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले. हर घर तिरंगा रॅलीची सुरुवात सिद्धार्थ महाविद्यालयातील प्रांगणातून करून जाफ्राबाद शहरातील विविध भागातून काढण्यात आली. रॅलीद्वारे जाफराबाद शहरवासीयांना हर घर तिरंगा मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले.

या रॅली मागची भूमिका हर घर तिरंगा मोहिमेद्वारे राष्ट्रीय अभिमान आणि एकात्मता वाढवणे, नागरिकांना राष्ट्रध्वज ठळकपणे प्रदर्शित करण्यास प्रोत्साहित करणे तसेच सेल्फी विथ तिरंगा या भारत सरकारच्या मोहिमेत सर्व भारतवासीयांना समावेशित करून घेणे, असा आहे. हर घर तिरंगा रॅलीचा समारोप डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक,जाफ्राबाद या ठिकाणी करण्यात आला. याप्रसंगी सिद्धार्थ महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. रमेश देशमुख, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. शिवाजी जगतवाड, प्रा.डॉ.प्रदीप मिसाळ, प्रा.श्रीमती.सरिता मणियार, सिद्धार्थ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रो. डॉ. सुनील मेढे अहो तसेच क्रीडा विभागाचे प्रा. उदय वझरकर, प्रा. शिवाजी वैद्य, प्रा.वाहेद पटेल, सिद्धार्थ महाविद्यालयातील रा.से.यो. स्वयंसेवक, विद्यार्थी-विद्यार्थिनी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. रॅलीचे विसर्जन हे राष्ट्रगीताने करण्यात आले.

## जिथे स्वच्छता तिथे आरोग्य हे निश्चित - डॉ. बळीराम बागूल

**जालना । प्रतिनिधी -** स्वच्छता आणि आरोग्य याचे अतुट नाते आहे. त्यामुळे तिथे स्वच्छता असते तिथे आरोग्य हे निश्चितच असते, त्यामुळे प्रत्येक नागरीकांनी आपले घर आणि घराप्रमाणे परिसर स्वच्छ ठेवला पाहिजे असे आवाहन संजिवनी मल्टी स्पेशालिटी हॉस्पीटलचे संचालक डॉ. बळीराम बागूल यांनी केले. जालना शहराला स्वच्छ आणि सुंदर करण्यासाठी विविध सामाजिक संस्थांच्या वतीने सुरु केलेल्या जालना फस्ट अभियानात मंगळवार दि. १२ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ६ वाजता उज्वल बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेने स्वयंसेवकासह सहभाग नोंदविला. त्यावेळी डॉ. बागल यांनी उपक्रमाचे कौतुक करुन सर्वांनी त्यात सहभागी होण्याचे आवाहन केले.

दरम्यान संस्थेच्या वतीने अंबड चौफुली ते नुतन वसाहत भागात स्वच्छता अभियान राबवून नागरिकांमध्ये जनजागृती केली. यावेळी उज्वल बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे स्वयंसेवक, पोलीस प्रशिक्षण केंद्रातील प्रशिक्षणार्थी,



जालना शहर महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या रोडवरील प्रत्येक दुकानदारांना स्वयंसेवकांनी कचरा न करण्याचे आवान केले, तसेच ज्या-त्या हॉटेलचा किंवा दुकानाचा कचरा हा डस्टबीन मध्येच टाकावा आणि झालेला कचरा तात्काळ सा अ करुन घ्यावा असे आवाहन स्वयंसेवकांनी दुकानदारांना केले, शिवाय दुकानाच्या परिसरातील कचराही स्वच्छ करुन जालना फस्ट च्या स्वच्छता अभियानात सहभाग नोंदविला. शहराला प्रदुषणमुक्त आणि पर्यावरणपूरक शहर करण्यासाठी विविध सामाजिक संस्थांनी पुढाकार घेतला आहे. दि. १ ऑगस्ट २०२५ ते १५ ऑगस्ट २०२५ दरम्यान हे अभियान राबविण्यात येत आहे.

यावेळी संस्थेचे सचिव अच्युत मोरे, स्वयंसेवक तथा सर्पमित्र मयुर साबळे, युवा बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे जयपाल राठोड, लोककलावंत विशाल उगले, स्वच्छता निरीक्षक अरुण वानखेडे, श्रावण सराटे यांच्यासह पोलीस प्रशिक्षण संस्थेचे प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

## माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा जल्लोषात संपन्न

**विशाल देशमुख**

**टेंभुर्णी -** कै. मारोतराव देशमुख माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, टेंभुर्णी येथे दहावीची बॅच मार्च २०१२ च्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहाच्या वातावरणात पार पडला. जुन्या आठवणींना उजाळा देत आणि परस्परांतील मैत्रीची नाळ घट्ट करत हा सोहळा आनंदात रंगला.

सकाळी ११ वाजता कार्यक्रमाची सुरुवात झाली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री.समाधान दुनगहू सर, यांनी भूषविले. ज्येष्ठ शिक्षक बालु धनवई, संतोष कोल्हे, संभाजी एंडोले, मोहन मनेमाणिक, एजाज बेग, गणेश आंधळे, श्रीमती संगीता विधाते मॅडम, विजय काठोळे, विजय मघाडे, श्रीमती माया पोटे मॅडम, अमोल देशमुख, प्रल्हाद खारतुडे, सुधाकर वाघमोडे, पंजाबराव देशमुख, सुभाष जाधव, बालाजी जोशी तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

माजी विद्यार्थ्यांमधून सुजाता धनवई, आकाश देवकाते, शत्रुघ्न मुळे, बाबासाहेब जोशी, अनिकेत अंभोरे, सचिन धनवई, अतुल मोटे, संतोष मैंद, कांता पाथरे, हसन बामिद्रक, विकास देशमुख, संतोष तांबेकर, सतीश पेटुळे, दत्ता तांबेकर, ज्ञानेश्वर धारे, कृष्णा सवडे, अनिल पाचे, मनीषा देशमुख, सविता घोडके, कविता सुद्रिक, अर्चना मुनेमाणिक, अश्विनी मुनेमाणिक, अश्विनी आढाव, मनीषा उखर्डे, शिल्पा देशमुख आणि इतर यांच्यासह अनेक जणांनी हजेरी लावली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला सर्व गुरुजनांचे,पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर शिक्षक व माजी विद्यार्थ्यांनी शालेय जिवनातील संस्मरणीय क्षण कथन केले. जुन्या मित्रमैत्रिणींची भेट झाल्याने सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.

माजी विद्यार्थ्यांनी शाळेच्या विकासासाठी आपले सहकार्य कायम ठेवण्याचे आश्वासन दिले आणि असाच कार्यक्रम पुन्हा पुन्हा आयोजित करण्याचे ठरविले, ज्यामुळे वातावरणात उत्साहाची लहर निर्माण झाली. संपूर्ण कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन सुजाता धनवई यांनी केले, स्नेहमेळाव्याचा समारोप गप्पा, आठवणी, हास्य आणि आत्मीयतेच्या वातावरणात पार पडला.



# जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांच्या हस्ते वृक्षारोपण; झाडांचा ९ वा वाढदिवस साजरा

## ९ वर्षापासुनची परंपरा कायम

**जालना । प्रतिनिधी -** सामाजिक न्याय विभागाच्या परिसरात गेल्या ९ वर्षापुर्वी लावण्यात आलेल्या झाडांचा वाढदिवस जिल्हाधिकारी श्रीमती अशिमा मित्तल यांच्या हस्ते नवीन वृक्ष लागवड करुन साजरा करण्यात आला. यावेळी उपस्थितांना पेढेही वाटप करण्यात आले. मंगळवार दि. १२ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११ वाजता हा वाढदिवसाचा सोहळा पार पडला.

यावेळी सहाय्यक आयुक्त राजु एडके, मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख, उज्वल बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे सचिव अच्युत मोरे, वरिष्ठ समाज कल्याण निरीक्षक गणेश अंभुरे, समाज कल्याण निरीक्षक अनिल सुनगत, सर्पमित्र मयुर साबळे, गोकुळ लाड, दिनेश प्रधान, गोपीनाथ ढोले, कृष्णा छत्रे, आशिष खरात, रंगनाथ खरात, अजय शिंदे, सिद्धार्थ जाधव, सुरेंद्र चित्तेकर, वरिष्ठ लिपिक संदीप कांबळे, गजानन गवळी, श्रीमती शारदा जावळे, राहुल तरटे, अमोल चाबुकस्वार, निलेश लक्कस, युवा बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे जयपाल राठोड, श्रीमती क्षीरसाग, भीम गायकवाड, कु. तृप्ती खैरे, सतीश पळसकर, वायाळ यांच्यासह कर्मचारी, बिव्हीजी व क्रिस्टल कंपनीचे कर्मचारी उपस्थित होते.

तत्कालीन सहाय्यक आयुक्त बलभीम शिंदे यांनी ९ वर्षापुर्वी मोकळ्या जागेत वृक्ष लागवड केली होती. या वृक्ष लागवडीचा पहिला वाढदिवस तत्कालिन जिल्हाधिकारी शिवाजीराव जोंधळे यांच्या हस्ते केक कापूर साजरा करण्यात आला होता. त्यानंतर ही परंपरा कायम ठेवण्यात आली. सामाजिक न्याय विभागाचे सहाय्यक आयुक्त कार्यालय आणि उज्वल बहुउद्देशीय सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यामाने दर वर्षी हा वाढदिवस साजरा करण्यात येतो. नवीन अधिकारी आणि जिल्हाधिकारी कार्यालयाचा समन्वय साधून या झाडांचा वाढदिवस अविरतपणे सुरु आहे.

सदरील झाडांचा वाढदिवस हा जिल्हाधिकारी यांच्या हस्ते कधी केक कापून साजरा करण्यात येत होता, परंतु, या वर्षी जिल्हाधिकारी श्रीमती अशिमा मित्तल यांच्या हस्ते वृक्ष लागवड करुन साजरा करण्याची परंपरा सुरु करण्यात आली. विशेष म्हणजे जे जिल्हाधिकारी वृक्ष लागवड करतील त्या झाडाला त्यांच्या नावाची पाटी लावण्याची सुचना जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल यांनी केली. दरम्यान परिसरात चांगले गार्डन आणि नागरीकांना बसण्यासाठी सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या सुचनाही त्यांनी यावेळी



केल्या.

सदरील परिसरात केलेली वृक्ष लागवडीचे आज मोठ-मोठ्या झाडात रुपांतर झाले आहे. हे झाडं जवविण्यासाठी बलभीम शिंदे यांच्यासह तत्कालिक सहाय्यक आयुक्त अमित घवले आणि कार्यालयातील कर्मचारी यांनी झाडांसाठी पाण्याची सुविधा उपलब्ध करुन दिली. त्यामुळे आजीही झाडे उन्हाळ्यात सावली देतात. हा परिसर अत्यंत निसर्गरम्य असून त्यात नवीन झाडांची लागवड करुन भर घालण्यात आली आहे.

# वंचित बहुजन आघाडीच्यावतीने आंदोलन

**परतूर । प्रतिनिधी -** परतूर मंठा तालुक्यातील विविध मागण्या साठी दि.११/०८/२०२५, रोजी हे धरणे आंदोलन करण्यात आले.दोन्ही तालुक्यातील अधिकारी कर्मचारी यांचा होत असलेला राजकीय वापर,शेतकरी कर्जमाफी,मग्रारोहयो सिंचन विहिरीना मंजुरी,यावर्षीच्या अतिवृष्टी नुकसानीचे पंचनामे,शिक्षण विभागातील चुकीच्या नेमणुका,शेत रस्ते,शिव रस्ते,पांदन रस्ते तक्रारींचा राजकीय दबावाखाली होत असलेला निर्णय व गैरकारभार,वंचित घरकुल धारकाना रेतीची उपलब्धता,मंठा मंडळ व परतूर तालुक्यातील विविध मंडळ जे गत वर्षी अतिवृष्टी लाभा पासून वंचित आहेत त्यांचा समावेश,परतूर शहरातील गुंठेवारी सुरू करणे,शहरातील स्वच्छता, व इतर समस्या सोडवणे,वाटर ग्रिड योजनेचे पाणी न पोहोचलेल्या गावाना पाणी देणे,आष्टी येथील ३.५४ कोटी पाणीपुरवठा काम ातील भ्रष्टाच्याराची चौकशी करून कारवाई करणे,घरकुल लाभार्थ्यांची पिळवणूक थांबवणे,गायरान जमिनी कायम करून ७/१२ वर नोंद घेणे ाशिसी पांदान रस्ते कामावर खडीकरणास मंजुरी देणे सृष्टी,को. हदगाव, संकनपुरी दलित स्मशान भूमीस जागा उपलब्ध करून देणे,ग्रामपंचायत १५ वा वित्त आयोग दिव्यांग निधी चे तत्काळ



वाटप करणे,व इतर मागण्या च्या पुरतते साठी हे आंदोलन करण्यात आले. यावेळी

वंचित बहुजन आघाडीचे नेते राम प्रसाद थोरात.परमेश्वर खरात. डॉ. किशोर त्रिभुवन. सुभाष जाधव. जमीर शेख. हेमंत पहाडे. चोखाजी सौंदर्य. नामदेव नाचन.परमेश्वर ढवळे.गौतम खंडागळे. महारुद्र राऊत. सुधाकर दवंडे. सिद्धेश्वर राऊत. सुदर्शन राऊत. एकनाथराव टोणपे. दत्तात्रय आव्हाड. दीपक वक्ते. संकेत प्रधान. बालासाहेब फलारी.योगेश काते. दादाराव साळवे. भारत उघडे. नारायण ढाकरघे. ईश्वर मोरे. राम चोरमारे. दत्तात्रय कुलथे. एकनाथ दवंडे. प्रभाकर गाते. रामेश्वर वंजारे. रुस्तुम रणशूर. काकासाहेब टोणपे. प्रकाश पाडेवार.भारत प्रधान. विष्णू मोरे. ज्ञानेश्वर भोकरे. हनुमंत मोरे. गुलाबराव दवंडे. अशोक उमिटे. सुनील सदावर्ते. व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

# जालन्यात काढण्यात आली भव्य कावड यात्रा; हर-हर महादेवच्या जयघोषाने वातावरण शिवमय

**जालना । प्रतिनिधी -** श्रावण महिन्याच्या पावन पर्वावर अखिल भारतीय अग्रवाल महासभा आणि थाडे श्वर मंदिर भक्त मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. १०) भव्य कावड यात्रा उत्साहात पार पडली. या यात्रेत महिला, पुरुष तसेच लहानग्या बालशिवभक्तांचा मोठ्या संख्येने सहभाग होता. संपूर्ण शहर हर-हर महादेवच्या जयघोषाने दुमदुमून गेले. दुपारी ४ वाजता नाथ बाबा मंदिरातून यात्रेला सुरुवात झाली. नर नारायण मंदिर, बडी सडक, बालाजी गल्ली, सिंधी पंचायत मार्गे कावड यात्रा थाडेश्वर मंदिरात दाखल झाली. आकर्षक व विविधरंगी कावड सजावट, टाळ-ढोल, भजने व घोषणांनी धार्मिक वातावरण भारावून गेले.






# जिल्ह्यात यलो अलर्ट; सोसाट्याचा वारा, पावसाची शक्यता दक्षता घेण्याचे प्रशासनाचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, कुलाबा, मुंबई यांनी दिलेल्या सूचनेनुसार जालना जिल्हयात दि. १३ ते १६ ऑगस्ट २०२५ रोजी यलो (धशश्रश्रे) अलर्ट जारी केला असुन तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाटासह वादळ, सोसाट्याचा वारा (ताशी ४०-५० कि.मी.प्र.ता. वेगाने) हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता वर्तवली आहे. या पार्श्वभूमिवर जिल्ह्यातील नागरिकांना दक्षता बाळगण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

मेघगर्जनेच्या वेळी, वीजा चमकत असताना किंवा वादळीवारे वाहत असतांना झाडाखाली किंवा झाडांजवळ उभे राहू नये. वीजेपासून बचावासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा, धोकादायक ठिकाणी सेल्फी काढू नये. गडगडाटीच्या वादळादरम्यान व वीजा चमकतांना कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये. वीजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा, ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे, मोटारसायकल / सायकल यांचेपासून दूर रहावे,मोकळे मैदान, झाडाखाली, टॉवर्स, ध्वजांचे खांब, विद्युत/दिव्यांचे खांब, धातुचे कुंपण, विदयुतवाहिनी अथवा ट्रॉन्सफोर्मजवळ थांबू नये. सर्व प्रकारच्या अर्थातरी लटकणा-या / लोंबणा-या तारांपासून दूर रहावे. विजा चमकत असताना मोकळ्या जागेवर असल्यास सुरक्षेसाठी गुडघ्यावर बसून हाताने आपले कान झाकावे व आपले डोके दोन्ही गुडघ्यांच्यामध्ये झाकावे, जमीनीशी कमीतकमी संपर्क असावा. अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे शेतीमालाचे नुकसान टाळण्यासाठी शेतकरी बांधवांनी वेळीच नियोजन करावे. शेतक-यांनी शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा. बाजार समितीमध्ये शेतमाल विक्रीसाठी आणला असेल किंवा त्याप्रमाणे नियोजन केले असेल, तर सदर मालाचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी,जनावरांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे.

सर्व नागरिकांनी वादळी वारे, वीज पासून स्वतः सह जनावरांचे संरक्षण होईल याबाबत योग्यती दक्षता घ्यावी, आपत्कालिन परिस्थितीत जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना ०२४८२-२२३१३२ वर तसेच नजीकचे तहसील कार्यालय, पोलीस स्टेशन यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.


